IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भारतीय लोकशाही विकेंद्रीकरणात पंचायतराज व्यवस्थेची भूमिका

**धामणे सुवर्णा पंढरीनाथ**
राज्यशास्त्र विभाग
के. आर. टी. आर्टस्, बी. एच. कॉमर्स आणि ए. एम. सायन्स (केटीएचएम) महाविद्यालय, नाशिक.

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*लोकशाही, विकेंद्रीकरण, सुशासन, ७३ वी घटनादुरुस्ती, पंचायत राज*

**ABSTRACT**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने देखील आर्थिक विकास आणि सामाजिक परिवर्तनाचे ध्येय साध्य करण्याच्या हेतूने लोकशाही स्वीकारण्याचा मार्ग स्वीकारला. पंडित नेहरूंनी लोकशाही विकेंद्रीकरणाला व्यक्तीस्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय या ध्येयांना प्राप्त करण्याचा एक सनदशीर मार्ग मानले. लोककल्याण हे राज्याचे सर्वोच्च ध्येय असून सामुहिक हिताचा विचार करण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले जाऊ शकते. सामाजिक व आर्थिक समता निर्माण होणे यातच लोकशाही विकेंद्रीकरणाची यशस्विता आहे. परंतु, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. भारतात पंचायतराज व्यवस्था म्हणजे लोकशाही विकेंद्रीकरण दृष्टीने उचललेले महत्त्वपूर्ण पाउल आहे. परंतु, ग्रामीण स्तरावर सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिवर्तन तसेच मानवी संसाधनाचा विकास करण्यात किती यशस्वी झालो आहोत हा एक प्रश्नच आहे. चांगली नीती निर्माण करून ती कुशल पद्धतीने कार्यान्वित केल्यास ग्रामीण पातळीवरचे अनेक प्रश्न सोडविण्यात मदत होऊन लोकांना खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रवाहात आणणे शक्य होईल. ग्रामीण पातळीवरील लोकांना शांततामय, सुव्यवस्थित, रास्त, सहभागात्मक जीवन लोकशाही विकेंद्रीकरणानेच होऊ शकते. त्यासाठी सुशासनाचा मार्ग कार्यक्षम आणि प्रतिसादात्मक आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Dhamane, S. P. (2026). भारतीय लोकशाही विकेंद्रीकरणात पंचायतराज व्यवस्थेची भूमिका. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 975–980.

**अध्ययनाची आवश्यकता:**

केवळ लोकशाही स्वीकारून लोकांचा सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणणे शक्य नाही. पंचायतराज स्वीकारल्यानंतर सरकारद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या दृष्टीकोनात आणि धोरणात बदल झाला आहे. सरकार विद्यमान कार्यक्रमांच्या अनुभवांच्या आधारे धोरणात्मक निर्णय घेत आहे. बहुतेक धोरणात्मक निर्णय व्यापक दृष्टीकोनातून घेतले जातात आणि सूक्ष्म पातळीवरील मुद्द्यांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. तथापि, ग्रामीण पातळीवरील विकास नियोजन आणि अंमलबजावणीच्या बाबतीत शासनाच्या कार्याची परिणामकारकता तपासता येणे गरजेचे आहे. ग्रामीण विकासासाठी पंचायतराज ही एक आवश्यक अट असली तरी, बदलत्या काळानुसार या स्थानिक स्वराज्य व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे, जेणेकरून ग्रामीण विकास जो आर्थिक आणि सामाजिक दोन्ही पैलुंशी संबंधित आहे तो राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडता येईल. त्यांचा व्यापक स्तरावर पुनरावृत्ती करण्यासाठी एक यंत्रणा विकसित करता येईल.

**संशोधन पद्धती:**

सदर शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलनावर आधारित असून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

१. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज व्यवस्थेची भूमिका आणि उद्देशांना समजून घेणे.

२. पंचायतराज व्यवस्थेसमोरील आव्हाने जाणून घेवून त्यासंदर्भात उपाय सुचविणे.

**शोधनिबंधाची गृहीतके:**

१. पंचायत राज व्यवस्थेमुळे लोकशाही विकेंद्रीकरणाला बळकटी मिळाली आहे.

**प्रस्तावना :**

लोकशाही शासनव्यवस्थेत सत्ताधारी जनतेला उत्तरदायी असतात आणि लोकसंमती मुळे शासनाला अधिमान्यता प्राप्त होते. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला हितसंबंधाचे संसूचन करण्याचा, समर्थन मिळविणे आणि प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार आहे. सक्रीय हितसंबंधी गट सत्ताधारकांवर नियंत्रण ठेवतात. लोकशाहीमध्ये विशिष्ट संस्थात्मक प्रक्रिया होतात. कार्यपालिका ही विधीमंडळास जबाबदार असते. सर्वांना मुलभूत स्वातंत्र्याचा हक्क दिला जातो. तसेच निष्पक्ष न्यायव्यवस्थेची निर्मिती केली जाते. जोपर्यंत ही लक्षणे अस्तित्वात आहेत. तोपर्यंत त्या व्यवस्थेची लोकशाही म्हणून ओळख कायम असते.

महात्मा गांधी यांच्या मते, 'लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून एक जीवनपद्धती आहे. लोकशाहीच्या माध्यमातून व्यक्तीला स्वातंत्र्य, सन्मान, सहकार्य आणि सहजीवन याची प्राप्ती होऊन राजकारणाला नवे अधिष्ठान मिळते. जनतेच्या

कल्याणासाठी समाजातील सर्व वेगवेगळ्या घटकांच्या शारीरिक, आर्थिक आणि आत्मिक शक्तीचा उपयोग केला जातो.' "भारत खेड्यांचा देश आहे, येथील आत्मा खेड्यांमध्ये निवास करते आणि जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही." महात्मा गांधीच्या या कथनावरून ग्रामीण विकासाचे उद्देश त्यांच्यासाठी किती महत्वपूर्ण आहे, हे लक्षात येते. विनोबा भावे यांनी विकेंद्रीकरण साध्य करण्यासाठी सर्वोदय चळवळीचा वारसा पुढे चालविला. तर जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी लोकशाहीच्या माध्यामतून प्रातिनिधिक लोकशाही ऐवजी प्रत्यक्ष लोकशाहीचे महत्त्व मांडले. याचबरोबर भारतीय दृष्टीकोनातून पंडित नेहरू, डॉ. बाबसाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, अरविंद घोष, मानवेंद्र रॉय, दीनदयाळ यांचे लोकशाहीविषयक विचार महत्त्वपूर्ण आहे.

ग्रामीण क्षेत्र हे भारताचा अविभाज्य भाग तर आहेच शिवाय भारताची ओळखदेखील शेतीप्रधान आहे. भारतात जवळपास ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहतात. पंचायत राज व्यवस्थेचा स्वीकार केवळ गावांची रचना किंवा पुनर्रचना करण्यासाठीच नव्हे, तर खऱ्या अर्थाने लोकशाहीसाठी आहे. याच अनुषंगाने ग्रामीण जीवनाच्या पुनर्निर्मितीची गरज ओळखून भारताच्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण विकासाला प्राथमिकता प्रदान केली गेली. परंतू, अनेक योजना आणि कार्यक्रम करूनही अपेक्षित यश आलेले दिसत नाही. आजही सामाजिक व आर्थिक विषमतामुळे दुर्बल घटकांचा नीती निर्धारणावर प्रभाव पडत नाही. लोकशाही व्यवस्था कितीही चांगली असली तरी विषमतेमुळे ग्रामीण स्तरावरील जनता वंचित राहते. म्हणूनच भारताच्या संदर्भात ग्रामीण क्षेत्राचा विकास योग्य व सुनियोजितपणे होण्यासाठी सुशासनाचा मार्गच सोयीस्कर आहे. कारण, सर्व व्यक्तींच्या पर्यायांचा आणि प्राथमिकतेचा सकल परिणाम साध्य करणे हे लोकशाहीचे ध्येय आहे.

भारतीय संदर्भात बघता, पंचायती राज ही लोकशाहीची एक व्याख्याच आहे. पंचायतराजचा इतिहास भारतात हजारो वर्षापासून अस्तित्वात आहे. वैदिक, मौर्य, गुप्त,चोल, मुघलशाही, ब्रिटिश राजवट ते आजपर्यंत पंचायतराज व्यवस्था विविध स्वरूपात लोकशक्तीचे प्रभावी प्रतीक राहिल्या आहेत. आजपर्यंत ज्या प्रत्यक्ष लोकशाहीची कल्पना आणि आकांक्षा व्यक्त केली गेली आहे, त्याचे मूर्त स्वरूप म्हणजे पंचायत-राज व्यवस्था होय. ब्रिटीश काळात स्थानिक स्वराज्य तत्त्वाचा पुरस्कार झाला असला तरी तो पंचायत राज व्यवस्था स्वायत्ततेच्या अभावामुळे दुर्लक्षित व कोलमडलेली राहिली. स्वातंत्र्योत्तर भारतात लोकशाही व्यवस्थेमध्येही सत्तेचे केंद्रीकरण न होऊ देता प्रत्येक स्तरावर लोकांचा राजकीय सहभाग वाढावा म्हणूनच लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्वीकारले गेले. ग्रामीण पातळीवरील शासनसंस्थाना अधिकार देणे आणि सर्वसामान्य लोकांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविणे यासाठी लोकशाही मुल्ये समाजात रुजणे आवश्यक मानले गेले. म्हणून लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने ग्रामीण स्तरावर विकासाच्या अनुषंगाने पावले टाकण्यास सुरुवात झाली.

भारतीय राज्यघटनेने 'सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची खात्री देणे.' हे उद्दिष्ट स्वीकारले आहे. तसेच राज्य मार्गदर्शक तत्त्वांमध्ये "कलम ४०: "राज्य हे ग्रामपंचायतींची सुसूत्र व्यवस्था लावण्यासाठी कार्यप्रवण होईल व त्यांना स्वराज्याचे मूलभूत घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील अशा शक्ती व प्राधिकार बहाल करील." ही तरतूद पंचायतराज संदर्भात करण्यात आली आहे आणि घटनेतील सातव्या परिशिष्टातील राज्यसूचीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश करण्यात आला.

ग्रामीण भागाचे मागसलेपण दूर करण्यासाठी विविध योजना राबविणे आवश्यक वाटू लागले. म्हणूनच, ग्रामीण विकासाच्या दृष्टीने राबविलेला उपक्रम म्हणजे सामुदायिक विकास कार्यक्रम जो २ ऑक्टोबर, १९५२ रोजी राबविण्यात आला. त्यानंतर लक्षात आले की, ग्रामीण विकास साधायचा असेल तर केवळ राजकीय व्यक्ती आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यावर अवलंबून चालणार नाही. जास्तीत जास्त लोकांचा सहभाग, कार्यक्षम जबाबदारीचे तत्व, आर्थिक, सामाजिक एकता आणि परिणामकारक दारिद्र्यनिर्मूलन इत्यादी साध्य करण्यासाठी खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरणाची कल्पना स्थानिक पातळीवर अवतरीत होणे गरजेचे आहे. जोपर्यंत स्थानिक लोकांचा प्रत्यक्ष सहभाग मिळत नाही तोपर्यंत हे उद्दिष्ट साध्य करणे अशक्य आहे. तेव्हा याचा अभ्यास करण्यासाठी बलवंतराय मेहता समितीची (१९५६) नेमणूक केली गेली. यालाच राष्ट्रीय पातळीवर पंचायतराज व्यवस्थेच्या विकासातील पहिला महत्त्वाचा टप्पा मानला गेला. यानंतर श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी. अहवाल (१९६२), जैन समिती अहवाल (१९६७), अशोक मेहता समिती (१९७७), श्री. जी. व्ही. के. राव अहवाल (१९८५), तसेच भारतीय संदर्भात ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्तीच्या निमित्ताने स्थानिक लोकशाहीची मोठ्या आशेने केलेली गुंतवणूक यासारखे विविध प्रयत्न शासनाने केलेले दिसून येतात.

भारतात ग्रामीण विकास संकल्पनेला व्यावहारिक स्वरूप येण्यासाठी अनेक योजना व कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न होताना दिसत आहेत. पंचवार्षिक योजना, राष्ट्रीयीकरण, २० कलमी कार्यक्रम, गरीबी हटाव योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम, श्यामाप्रसाद मुखर्जी रुर्बन अभियान यासारख्या कितीतरी योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून होताना दिसते. ग्रामीण विकास साध्य करण्याच्या दृष्टीने पंचायतराज व्यवस्था राज्याचे मध्यस्थ म्हणून कार्य करते. पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी लोकशाहीचे विकेंद्रीकरण साध्य झाले आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायत पद्धतीचा घटनात्मक दर्जा मिळाला. ग्रामीण भागातील लोकांना आपल्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी पंचायतराज व्यवस्थेची मदत झाली आहे. ग्रामीण स्तरावर मुलभूत सुविधांच्या बाबतीत जाणीव जागृती झाली. शासकीय धोरणात जबाबदारी आणि पारदर्शकता वाढली. तसेच महिला, अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळाले, थोडक्यात पंचायत व्यवस्थेने भारतीय लोकशाहीला बळकटी मिळाली.

परंतू, ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंचायतराज व्यवस्था खरंच तितकी सक्षम आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. नाण्याला जशा दोन बाजू असतात त्याचप्रमाणे पंचायत राज व्यवस्थेचे जसे सकारात्मक परिणाम घडले तसे नकारात्मक परिणाम देखील घडले. हजारो कोटीच्या योजना व कार्यक्रम असून देखील ग्रामीण विकास साध्य करण्यात आपल्याला पूर्णतः यश आलेले दिसत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सुशासनाचा अभाव होय. ग्रामीण भागात विकास कार्ये करताना नवनवीन प्रशासकीय आव्हाने निर्माण होताना दिसतात. ही आव्हाने म्हणजे स्थानिक राजकारण, प्रशासकीय उदासीनता, दूरदृष्टीचा अभाव, लोक सहभागाचा अभाव, भ्रष्टाचार, शासन व प्रशासन समन्वय अभाव, लालफितीचा कारभार, अकार्यक्षमता

आदी होय. सुरवातीला विकासाची संकल्पना ही औद्योगीकरण आणि आधुनिकीकरणाभोवती केंद्रीभूत होती. त्यामुळे देशाच्या विकासाची विभागणी शहरी भारत व ग्रामीण भारत अशी झाली. ज्या वेगाने शहरी भागाचा विकास झाला तेवढा ग्रामीण भागाचा झाला नाही. म्हणजेच भारतात होत असणारा हा विकास सहभागी प्रवृत्तीचा किंवा जबाबदारीच्या अनुषंगाने इतका सुलभ नव्हता. त्यामुळे गरिबांच्या विकासाकडे लक्ष दिले गेले नाही. ग्रामीण भागात आजही पायाभूत सुविधांचा अभाव, कृषी क्षेत्राकडे होणारे दुर्लक्ष, दारिद्र्य व बेरोजगारी, शिक्षण व आरोग्याची समस्या, अंधश्रद्धा व जातीभेद यासारख्या समस्या ग्रामीण विकासापुढील आव्हाने आहे. जातीभेद यासारख्या समस्या आहेत. म्हणूनच, बदलत्या काळानुसार गरीब आणि तळागाळातील ग्रामीण विकासासाठी विकासाचे प्रयत्न पुनर्निर्देशित करण्याची गरज भासू लागली.

ग्रामीण विकास म्हणजे “ग्रामीण भागातील लोकांच्या संबंधित असलेल्या विविध घटकांचा, नैसर्गिक व भौतिक साधनांचा गुणात्मक व संख्यात्मक विकास घडवून आणणे होय.” भारतीय नियोजन आयोगाने म्हटले आहे की, “ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात सुधारणा घडवून आणली जाते. तिला ग्रामीण विकास म्हणता येईल.” भारतीय नियोजन आयोग ज्याला आपण नीती आयोग म्हणून ओळखतो त्यांनी देखील ग्रामीण लोकांचा विकास करण्यासाठी सामाजिक व आर्थिक विकासावर भर दिला आहे. संयुक्त राष्ट्राच्या मते, “शासन व जनतेच्या संघटित प्रयत्नांद्वारे सर्व समाजाच्या आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.” ग्रामीण विकासाचा संबंध सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रशासकीय पैलूंचा विकास घडवून आणण्यासाठी आणि लोकांच्या समस्यांची सोडवणूक करून त्यांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्याशी आहे. ग्रामीण विकासाची संकल्पना ही बहूआयामी आहे. ज्यामध्ये कृषीविकास, शेतीपुरक व इतर उद्योगांचा विकास, आरोग्य, शिक्षण, ऊर्जा दळणवळण, दारिद्र्यनिर्मूलन, पायाभूत सुविधा अशा वेगवेगळ्या सोई व सुविधांचा विकास घडवून आणणे अपेक्षित आहे.

समाजाची वाढती गुंतागुंत सोडविण्यासाठी प्रशासनाने देखील बदलत्या स्थितीनुसार नवीन प्रवाहाचा स्वीकार केलेला दिसतो. स्वराज्यानंतर सुराज्य तसेच शासनानंतर सुशासन या संकल्पनेची चर्चा होताना दिसते. सरकार आणि जनता यांच्यातील मैत्रीपूर्ण सहकार्यासाठी प्रशासनाची भूमिका महत्वपूर्ण आहे. भारतासारख्या बहुविध वैशिष्ट्ये असलेल्या समाजात जनकल्याण आणि देशाची सुव्यवस्था या दृष्टीने एक कटिबद्ध, कुशल, इमानदार आणि सक्षम प्रशासन निर्मिती हा एकमेव पर्याय आहे. जनतेच्या आवश्यकता ओळखून शाश्वत विकेंद्रीकरण, कार्यक्षमता आणि न्याय या मार्गाने विकासांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. ग्रामीण पातळीवरील गरिबांच्या सक्षमीकरणासाठी व उन्नतीकरता सक्षम शासकीय आणि प्रशासकीय संस्थांची गरज आहे. सुशासनाच्या विविध प्रकारांपैकी एक प्रकार म्हणजे स्थानिक सुशासन होय. यात पारदर्शकता, जबाबदारीपणा, कायद्याचे अधिराज्य, लोक सहभाग, समानता, उत्तरदायित्व यांची अंमलबजावणी करणे सहज आणि सुलभ होते. लोकशाहीचे विकेंद्रीकरण स्थानिक सुशासनासाठी आवश्यक आहे. त्यात पंचायतराज संस्था, ई-प्रशासन, बिगर शासकीय संघटना, राजकीय नेतृत्व, जनता हे महत्त्वाची भूमिका बजावतात. जनतेला स्थानिक राज्यकारभारात सहभाग घेणे शक्य होते त्यामुळे ग्रामीण विकासासंदर्भात जनजागृती करणे सुलभ होते. ग्रामीण विकासासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे जाहीर होणाऱ्या योजना, अभियान ह्या ग्रामीण लोकांना विश्वासात घेऊन राबविल्या जाऊ शकतात. आज ई-प्रशासन सुशासनाची गुरुकिल्ली मानली जाते. ई-प्रशासनाने

प्रशासनाला जनतेच्या जवळ आणले आहे. प्रशासकीय कार्यात गुणवत्तापूर्ण सुधारणा होत आहे. आज जन्मदाखला, आधारकार्ड, पॅनकार्ड, जातप्रमाणपत्र, विविध फॉर्म भरणे अशी कामे ऑनलाइन पद्धतीने होत आहे. सुशासन ग्रामीण भागात प्रस्थापित करण्यासाठी व पंचायतींना अधिक तत्पर पारदर्शी प्रभावशाली बनवण्यासाठी ई-पंचायतची अंमलबजावणी करण्यात आली आहे. याचबरोबर माहितीच्या अधिकारामुळेदेखील स्थानिक कारभारात पारदर्शकता वाढलेली दिसते. राष्ट्रीय पातळीवरील लोकशाही यशस्वी होण्यासाठी तळागाळातील संघटना मजबूत असणे आवश्यक आहे. स्थानिक अधिकाऱ्यांनी लोकांच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. तसेच जनतेच्या तक्रारीचे निवारण केले पाहिजे तरच प्रशासकीय यंत्रणेवर लोकांचा विश्वास निर्माण होईल.

पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून लोकशाही विकेंद्रीकरण होऊन तळागाळातील लोकांचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य करणे आणि शासकीय योजना ग्रामीण भागात पोहोचविणे शक्य झाले आहे . परंतु, व्यवस्थेच्या मर्यादा लक्षात घेता, ग्रामीण पातळीवर लोकांच्या गरजा पूर्ण करणे आणि स्थानिक समस्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. कारण, ग्रामीण भागांचा अपेक्षित त्या प्रमाणात विकास झालेला नाही. परंतु ज्या गावांमध्ये योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी कुशलतेने आणि पारदर्शक पद्धतीने केली जाते, ती गावे विकसित झालेली दिसून येतात. म्हणूनच, जर ग्रामीण भागांचा विकास साधायचा असेल तर पंचायतराज व्यवस्थेला बळकट करणे तसेच तिला कार्यक्षम आणि पारदर्शक बनवणे आवश्यक आहे. ग्रामीण विकासाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पंचायतराज व्यवस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

**संदर्भ**:

१) गोडबोले माधव, अनुवाद – गोडबोले सुजाता, २०१५, हरवलेले सुशासन, पुणे, विश्वकर्मा पब्लिकेशन.

२) गौर पी. पी., मराठा आर. के., २००४, लोकतांत्रिक विकेंद्रीकरण और ग्रामीण विकास, नवी दिल्ली, आदित्य पब्लिशर्स.

३) धारवाडे बाबुराव,२००६,पंचायत प्रशासन, पांजरपोळ, जीवन सारथी प्रकाशन.

४) पंत डी. सी., २०११, भारत मे ग्रामीण विकास, नवी दिल्ली, विश्व भारती पब्लिकेशन.

५) फाडीया बी. एल.,२००५, लोकप्रशासन (प्रशासकीय सिद्धांत), साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा.

६) भोळे भा. ल., २००३, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकरण, नागपूर, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.

७) १९९५, ग्रामीण विकास लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्या भूमिका व जबाबदऱ्या, पुणे, यशदा, यशमंथन.

८) राव एन. भास्कर, २०१७, सुशासन भ्रष्टाचार मुक्त लोकसेवाओं का प्रदाता, नई दिल्ली, सेज/भारत पब्लिकेशन.

९) शिरसाठ शाम आणि बनौड भगवानसिंग, पंचायत आणि नागरी प्रशासन, औरंगाबाद,विद्या बुक्स पब्लिकेशन.

१०) डॉ. शुक्ल सोमनाथ, २००९ , लोकतंत्र, कानपूर, आशिष प्रकाशन.

११) सचदेव डी. आर., १९९४, भारत मे समाजकल्याण प्रशासन, जयपूर, किताब महाल पब्लिकेशन.

१२) Barthwal C. P., 2003, Good Governance in India, New Delhi, Deep & Deep Publication.

१३) Singh Hoshiar & Sachdeva Pradeep, २०११, Public Administration, Delhi, Pearson.

१४) Singh & Singh, Indian Administration, Pearson, Delhi.